**सं.फौ.ख.क्रं. ५००/२०२५**
**सरकार वि. भिमराव**
**नि.क्र. ०७ खाली.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन आणि खऱ्या शिवाय काहीही सांगणार नाही.

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | मंगेश शिवचरण बाभरे, |
| वय सुमारे | : | ४३वर्ष, व्यवसाय – पोलीस हवालदार ब.क्र.१०५२, |
| निवासस्थान | : | पोलीस स्टेशन अड्याळ, तालुका पवनी, जिल्हा: भंडारा |

**<u>शपथेवर सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील लिंगायत मॅडम , यांचेमार्फत</u>–**

**१.** दिनांक २४/०५/२०२५ रोजी मी पोलीस स्टेशन अड्याळ येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. दिनांक २५/०५/२०२५ रोजी माझ्या कडे अपराध क्र.१३५/२०२५ कलम ६५ ई म.दा.का. या गुन्ह्याचा तपास सोपविण्यात आला होता. पोलीस डायरी सोबत मला जप्ती पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, आरोपीला सुचनापत्रावर सोडल्याचे नोंद आणि इतर कागदपत्र सोपविण्यात आले होते. तपासादरम्यान मी साक्षदारांचे बयान नोंदविले. आणि जप्त मुद्देमालाची सी.ए. रिपोर्ट प्राप्त केला. आरोपीविरूध्द पुरवा मिळून आल्याने तपाअंती मी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास संपला.**

**<u>आरोपी तर्फे उलट तपास श्री.मेश्राम वकील साहेब यांच्या मार्फत सुरू.</u>**

२. तपासादरम्यान मी घटनास्थळी गेलो नव्हतो. आरोपीच्या घरासंबंधीचे कागदपत्रे मी प्राप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

<u>**फेरतपास काही नाही.**</u>

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकूंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र. २), पवनी.
०६/०४/२०२६

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकूंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र. २)पवनी.
०६/०४/२०२६